जा.क्र.शेमासे/मा.सू./लक्षांक १४-१५/२९२/१४
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य
पुणे-०५, दि. १० जून २०१४

**प्रति,**

**विभागीय कृषि सहसंचालक**
**........... विभाग .............**

**विषय - शेतकरी मासिक योजना सन २०१४-१५ साठी लक्षांक व मार्गदर्शक सूचना....**

सन १९६५ पासून कृषि विभागामार्फत ४८ पानी शेतकरी मासिक शेतक-यांच्या सेवार्थ कृष्णधवल स्वरूपात सुरू होते. माहे मे-२००९ पासून रंगीत स्वरूपात **हे मासिक** ५६ पानी प्रसिध्द करण्यात येत आहे. या मासिकामध्ये कृषि व कृषि संलग्न विद्यापीठाचे तज्ञ, कृषि व संलग्न खात्याचे अधिकारी यांचे लेख तसेच कृषि क्षेत्रात काम करणा-या संस्था आणि कृषि क्षेत्रातील प्रगतीशील शेतकरी यांच्या यशोगाथा प्रसिध्द करण्यात येतात. बदलत्या काळाची गरज ओळखून शेतीसंबधी इतर पूरक व्यवसाय, बाजार व्यवस्थापन, कृषिप्रक्रीया, निर्यातक्षम शेतीसाठी महत्त्वाचे निकष, राष्ट्रीयीकृत बँकांमार्फत शेतक-यांना देण्यात येणा-या सुविधा/मदती बाबतची माहिती ही त्या क्षेत्रात काम करणा-या तज्ञ व्यक्तीकडून घेऊन प्रसिध्द करण्यात येते. राज्यातील शेतक-यांना आधुनिक कृषि तंत्रज्ञान, कृषि विषयक झालेले संशोधन वेळोवेळी या मासिकाच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात येते.

**सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये शेतकरी मासिक या योजनेसंबंधीत विशेष सूचना खालीलप्रमाणे .**

**अ) लेख/लेखन/बातम्या/यशोगाथा :**

**१) शेतक-यांमधून उत्कृष्ट लेखक तयार करणे -** शेती व्यवसाय करताना पारंपरिक शेती पध्दतीला नव्या तंत्रज्ञानाची जोड देऊन शेतीतील उत्पन्न शास्त्रीय आधारे वाढविणा-या शेतक-यांच्या प्रयोगाचे, अनुभवाचे बोल त्यांच्याच लेखणीतून इतर लाखो शेतक-यांपर्यत पोहोचविण्यासाठी शेतक-यांना शेतकरी मासिकामधून लेख लिहण्यासाठी प्रवृत्त करावे.

**२) लेख / बातम्या प्रसिध्द करणे**: शेतकरी मासिकामधून कृषि विद्यापीठाचे शास्रज्ञ, विविध विभागांचे अधिकारी, कृषि पुरस्कार प्राप्त व प्रगतीशील शेतकरी, इत्यादी मान्यवरांचे लेख प्रसिध्द केले जातात. याशिवाय कृषि विभागाचे मा.मंत्री महोदय, इतर सन्माननिय पदाधिकारी तसेच खात्याचे वरिष्ठ अधिकारी यांचे उपस्थितीत क्षेत्रीयस्तरावर वेळोवेळी जे कृषिविषयक कार्यक्रम आयोजित केले. त्यांना कृषिवार्ता या सदरातून प्रसिध्दी देण्यासाठी लेख छायाचित्रासह संपादक शेतकरी मासिक यांचेकडे पाठवावेत. प्रगतीशील शेतकरी तसेच नाविन्यपूर्ण कामे करणा-या शेतक-यांच्या कामांचा इतर शेतक-यांना उपयोग व्हावा, या दृष्टीने यशोगाथा या सदराखाली अशा शेतक-यांच्या कार्याला प्रसिध्दी दिली जाते. तसेच खात्यातील अधिकारी / कर्मचारी यांनी आपल्या अनुभवावर आधारित कृषिविषयक लेख / यशोगाथा पाठविल्यास त्यांनाही वेळोवेळी प्रसिध्दी देण्यात येते. या संदर्भातील उपयुक्त माहिती शेतकरी मासिक कार्यालयास ज्या महिन्यात प्रसिद्ध करावयाचा आहे, त्यापूर्वीच्या महिन्याच्या ५ तारखेपर्यंत १२-१५ मेगापिक्सेलच्या रिझोलुशनचे छायाचित्रासह पाठविण्यात यावी. शासनाने शेतकरी मासिकातील लेखांसाठी रुपये १००/- प्रती छापील पान याप्रमाणे असे मानधन निश्चित केले आहे.

**३) नवीन योजना/कार्यक्रम/अभियान बाबत- लेख :** जिल्हयात नवीन योजना/अभियान आधारीत कार्यक्रम राबविण्यात आले. असल्यास त्याआधारे लेख तयार करून संपादक, शेतकरी मासिक कृषि आयुक्तालय, पुणे या कार्यालयास त्वरीत पाठवावेत.

**४) यशोगाथा प्रसिध्द करणे** : कृषि विभागामार्फत विविध योजना प्रभावीपणे राबविल्या जातात. योजनांच्या अमंलबजावणीमुळे शेतक-यांच्या उत्पादनात/उत्पन्नात विशेष वाढ होते व त्याचप्रमाणे योजनांच्या स्वरूपानिहाय अनुषंगिक बदल घडून येतात. त्यामुळे शेतक-यांच्या/ समाजाच्या सामाजिक/आर्थिक जीवनावर सकारात्मक बदल घडतात. अशा यशोगाथा आपल्या स्तरावरुन शेतकरी मासिकात प्रसिध्दीस पाठविण्यात याव्यात. जेणेकरून एक चांगला संदेश तळागाळापर्यंत पोहचेल व इतर वाचक शेतक-यांना त्यातून प्रेरणा मिळेल. त्यातून शेतकरी मासिकाचा उद्येश सफल होईल. यासाठी संपूर्ण राज्यातून विविध कार्यालयामार्फत अशा यशोगाथा शेतकरी मासिक कार्यालयास पाठवाव्यात. यासाठी जिल्हयातून जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, कृषि विकास अधिकारी तसेच प्रकल्प संचालक (आत्मा) यांनी दरमहा किमान एक यशोगाथा शेतकरी मासिकात प्रसिध्द करण्यासाठी पाठवावी. यशोगाथा पाठवताना ज्या क्षेत्राची यशोगाथा आहे, त्याठिकाणी कृषि विभागाने कोणकोणती कामे घेतली व त्याचा सामाजिक व आर्थिक बदलांवर काय परिणाम झाला, याचे आकडेवारीसह विश्लेषण पाठविण्यात यावे.

**ब) शेतकरी मासिकासाठी वर्गणीदार करणे.**

१) राज्यातील व राज्याबाहेरील कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही महिन्यापासून शेतकरी मासिकाचा वर्गणीदार होता येईल. कृषि विभागामार्फत राबविण्यात येणा-या सर्व **योजनामधील लाभार्थी शेतक-यांना शेतकरी मासिकाचे वर्गणीदार करणे अनिवार्य आहे.** तसेच ग्रामपंचायती, सहकारी सोसायट्या, खाजगी फळरोपवाटिका, खाजगी माती परीक्षण प्रयोगशाळा, जैविक खते, कीटकनाशके, उत्पादक कंपन्या, कृषि चिकित्सालये, कृषि वाचनालये, कृषि विज्ञान मंडळे, समूह शेती / गटशेतीतील शेतकरी, सहकारी दूध संस्था, साखर कारखाने सभासद, कृषि संलग्न विभाग, बाजार माहिती केंद्र, कृषि उत्पन्न बाजार समिती, सार्वजनिक वाचनालय, महिला स्वयंसहाय्यता बचत गट तसेच जास्तीत जास्त शेतक-यांना या मासिकाचे वर्गणीदार करून घ्यावे. एकात्मिक कीड व्यवस्थापन प्रात्यक्षिके, पीक उत्पादन वाढ प्रात्यक्षिके, फळबाग लागवड, बीजोत्पादन कार्यक्रम, कृषिप्रकिया उद्योग, जलसंधारण कामे, रामेती व वनामतीमध्ये प्रशिक्षण घेणारे प्रशिक्षणार्थी, कृषि विभागाचे क्षेत्रिय तांत्रिक कर्मचारी, शेतकरी प्रशिक्षण, कृषि प्रदर्शने, चर्चासत्रे, शेतकरी अभ्यास दौरे, केंद्र पुरस्कृत यांत्रिकीकरण योजना, हरितगृह योजना, ठिबक व तुषार सिंचन योजना इ. योजनांचे लाभ घेणारे लाभार्थी यांना शेतकरी मासिकाचे वर्गणीदार करून घ्यावे. प्रक्रिया केंद्रे, रासायनिक व सेंद्रिय खत उत्पादक, कीटकनाशके उत्पादक व बियाणे उत्पादक आणि विक्रेते यांनाही व्दिवार्षिक वर्गणदार करून घ्यावे.

**२) ग्रामपंचायतीस वर्गणीदार करणे** :- सर्व ग्रामपंचायतीना शेतकरी मासिकाचे वर्गणीदार करुन घेण्यासाठी ग्रामविकास विभागाने शासन परिपत्रक क्रमांक व्हीपीएम-२६०२/प्र.क्र./१८५८/२२ दि. १८-९-२००२ अन्वये निर्गमित केले आहे. गावपातळीपर्यंत पोहोचणा-या शेतकरी मासिकाच्या माध्यमातून कृषि क्षेत्रातील नवीन संशोधन, आधुनिक तंत्रज्ञान, शासनाच्या विविध योजना, कृषि क्षेत्रातील लक्षवेधक घडामोडी तसेच कृषि व संलग्ने व्यवसाय व बँकांकडील माहिती शेतक-यांपर्यंत माफक किमतीमध्ये पोहोचविण्यात येत आहे. या दृष्टिकोनातून प्रत्येक ग्रामपंचायतीस शेतकरी मासिक प्राप्त होणे आवश्यक आहे. कृषि विकास अधिकारी यांनी त्यांचे स्तरावरून प्रत्येक ग्रमापंचायतीस, ज्या गावात ग्रामपंचायत नसेल तेथील सार्वजनिक वाचनालयास शेतकरी मासिकाचे नियमित वर्गणीदार करून घ्यावे.

**३) कृषि प्रदर्शने, चर्चासत्रे व मेळावे -** क्षेत्रीय कार्यालये, जिल्ह्याचे मुख्यालय तसेच आपले कार्यालयात शेतकरी मासिकाचे वर्गणीदार करण्याचे दृष्टीने दर्शनीय ठिकाणी सूचनाफलक लावावा. विविध स्तरावर शेतकरी मेळावे, कृषि प्रदर्शने, धान्य व फळ महोत्सव, कृषि दिंडी, प्रशिक्षण कार्यक्रम तसेच चर्चासत्रे मोठ्या प्रमाणावर आयोजित केली जातात. सदरील कार्यक्रमात शेतक-यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग असतो. स्थानिक कृषि विभाग कार्यालये अशा प्रदर्शनामध्ये सहभागी होतात. अशा ठिकाणी शेतकरी मासिकाचे वर्गणीदार करुन घेणे व अंक विक्री करण्यासाठी स्थानिक स्तरावरच व्यवस्था करावी. त्यासाठी लागणारे साहित्य, शासकीय पावती पुस्तके संबंधित कार्यालयाकडील वापरावीत. विक्रीसाठी लागणारे अंक मागणीप्रमाणे आयुक्तालय स्तरावरुन उपलब्ध करुन देण्यात येतील. मात्र ऐनवेळी अडचणी येऊ नयेत; म्हणून अशावेळी जादा अंकाची मागणी अगोदर नोंदवावी. ती संबंधितांनी या कार्यालयाकडून घेऊन जावीत. जमा झालेली रक्कम मुद्या क्र. ''क'' मध्ये दिलेल्या लेखा शिर्षाखाली स्थानिक कोषागारात भरुन वर्गणीदारांची यादी मूळ चलनासह शेतकरी मासिक कार्यालयास पाठवावी त्यानंतर वर्गणीदार करुन घेऊन अंक नियमित पाठविण्यात येतील.

**४) कृषि सेवा केंद्र :-** कृषिसेवा केंद्रामार्फत खते, बियाणे व औषधे यांची विक्री केली जाते. शेतकरी मासिकामध्ये हंगामनिहाय शेतपिके, फळपिके बाबत तंत्रज्ञान, बियाणे संबंधित माहिती तसेच कीड व रोग या संबंधित माहिती प्रसिध्द करण्यात येते. त्या आधारे कृषि सेवा केंद्रांमार्फत शेतक-यांना माहिती पुरविणे सोयीस्कर आहे. त्यासाठी कृषि विकास अधिकारी यांनी त्यांचे जिल्ह्यातील सर्व कृषिसेवा केंद्रांना शेतकरी मासिकाचे वर्गणीदार करून घ्यावे.

**५) आत्मा अंतर्गत व इतर कार्यक्रमातंर्गत तयार होणा-या गटांना वर्गणीदार करणे :-** कृषि विभागातील आत्मा, राष्ट्रीय फलोत्पादन अभियान तसेच इतर अभियान/योजनातंर्गत शेतकरी समूह गट तयार केले जातात. या शेतकरी समूह गटास शेतकरी मासिकाचे वर्गणीदार करून त्या गटांना शेतकरी मासिकामार्फत आधुनिक तंत्रज्ञान पोहचविणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांनाही वर्गणीदार करून घ्यावे.

**६) परदेश दौ-यासाठी निवड करण्यात येणा-या शेतक-यांना वर्गणीदार करणे:-** विविध देशांनी विकसित केलेले शेती विषयक तंत्रज्ञान व अनुषंगिक बाबी याची माहिती त्या त्या देशातील शेतक-यांशी प्रत्यक्ष चर्चा करुन राज्यातील शेतक-यांना वगत करण्यासाठी राज्यातील शेतक-यांचे देशाबाहेर अभ्यास दौरे राज्य शासनामार्फत आयोजित करण्यात येतात. परदेशात अभ्यास दौ-यासाठी पाठविण्यात येणा-या शेतक-यांना शेतकरी मासिकाचे वर्गणीदार करणे आवश्यक आहे. तरी जिल्हा स्तरांवरून परदेश अभ्यास दौ-यासाठी निवड करतांना जे शेतकरी, शेतकरी मासिकाचे वर्गणीदार असतील त्यांचीच निवड करण्यात यावी.

**७) वसुंधरा प्रकल्प राबविणा-या सेवाभावी संस्थांना वर्गणीदार करणे :-** ज्या सेवाभावी संस्थामार्फत राज्यात वसुंधरा प्रकल्प राबविण्याा येत आहे अशा सर्व संस्थांना शेतकरी मासिकाचे किमान व्दिवार्षिक व त्यांच्या कार्यक्षेत्रातील शेतक-यांना किमान वार्षिक वर्गणीदार करण्यात यावे. संस्थांची वर्गणी वसुंधरा पाणलोट प्रकल्प यंत्रणा यांचेमार्फत राज्य स्तरावरूनच भरण्यात यावी.

**८) वर्गणीदारांचे जिल्हानिहाय लक्षांक**

सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी प्रत्येक तालुक्यासाठी एकूण १४०० शेतकरी मासिकाचे वर्गणीदारांचे लक्षांक निर्धारित केला असून (जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी -७००, कृषि विकास अधिकारी -४२० व प्रकल्प संचालक आत्मा-

२८०) त्यापैकी जिल्हा स्तरांवरून जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, कृषी विकास अधिकारी व प्रकल्प संचालक (आत्मा) यांनी जिल्हयातील तालुक्यांच्या संख्येनुसार वर्गणीदार करण्याचे लक्षांक ठरवावे. विविध स्तरावर काम करणारे क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी वर्ग तसेच राज्यातील शेतकरी कुटुंबांची संख्या विचारात घेता संबंधित जिल्ह्यांना वर्गणीदार करण्याचे दिलेले लक्षांक अत्यंत योग्य आहे. सोबत सहपत्रीत केलेल्या प्रपत्र-१ मध्ये नमूद केल्यानुसार जिल्हा स्तरावर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी एकुण लक्षांकच्या ५० टक्के, कृषि विकास अधिकारी यांनी ३० टक्के आणि प्रकल्प संचालक (आत्मा) यांनी २० टक्के या प्रमाणात शेतकरी मासिकाचे वर्गणीदार तयार करण्याचे वार्षिक लक्ष्यांक निश्चित केले असून त्याप्रमाणात साध्य करण्याची कार्यवाही करावी.

सन २०१४-१५ या वर्षात जिल्हा स्तरावर होणा-या विविध कृषि प्रदर्शनामध्ये शेतकरी मासिकाचे कमीत कमी १००० वर्गणीदार करण्यात यावेत. जिल्ह्यातील कृषि प्रदर्शना संबंधित वेळापत्रक तयार झाले असल्यास आयुक्तालयास पाठवावे. तसेच कृषी विभागातील सर्व तांत्रिक अधिकारी / कर्मचारी यांना वर्गणीदार करण्यात यावे. राज्यातील सहकारी साखर कारखान्यांचे सभासद, द्राक्ष बागायतदार संघाचे सभासद, डाळिंब संघ तसेच इतरही फळ उत्पादक संघांचे सभासद इ. सर्वांना मासिकाचे वर्गणीदार करण्यात यावे.

**क) मासिकाची वर्गणी**

शेतकरी मासिकाची वार्षिक वर्गणी रूपये १५०/- तर द्विवार्षिक वर्गणी रूपये २५०/- असून किरकोळ अंकाची किंमत रूपये १५/- एवढी आहे. **मासिकाची वार्षिक वर्गणी रक्कम शेतकरी मासिक कार्यालयात रोखीने भरता येणार नाही**. वर्गणीची रक्कम क्षेत्रीय कार्यालयाकडून चलनाने किंवा ग्रास प्रणालीमार्फतच स्वीकारली जाते. वैयक्तीक शेतकरी वर्गणी मनीऑर्डरने शेतकरी मासिक कार्यालयास पाठवू शकतात. सन २०१३-१४ या वर्षापासून संगणकीय ग्रासप्रणालीतून (Government Receipts Accounting System- GRAS) महसूल जमेची रक्कम ऑनलाईन पध्दतीने भरण्याची कार्यपध्दती विकसित करण्यात आली असून त्या कार्यप्रणालीची प्रत सोबत सहपत्रीत केली आहे. त्यानुसार तालुका कृषि अधिकारी यांनी GRAS प्रणालीव्दारे भरणाकरून चलनाची प्रत व पत्त्यांची यादी शेतकरी मासिक कार्यालयास पाठवावी. सदर चलनाची प्रत व यादी शेतकरी मासिक कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर नवीन वर्गणीदारांना सभासद क्रमांक दिला जातो. अंकाबाबत कार्यालयाशी पत्रव्यवहार करताना संबंधित वर्गणीदाराने सभासद क्रमांक व वर्गणीचा कालावधी नमूद करणे आवश्यक राहील. कृषि विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयांना पुढील प्रमाणे लेखाशिर्षाखाली कोषागारात वर्गणी जमा करुन शेतक-यांना वर्गणीदार करुन घेता येईल.

***कृषि विभाग, ०४०१ पीक संवर्धन,***

***८०० इतर जमा रकमा,***

***(०१) (०१) शेतकरी मासिक, (०४०१०११४) (०४०१०३४८०१)***

**वर्गणीदारांच्या पत्त्यांच्या याद्या** :

वर्गणीदारांचे पत्ते सुवाच्छ अक्षरात आणि पिन कोड घालून येत नसल्यामुळे शेतक-यांना वेळेवर अंक प्राप्त होत नाहीत व अंक परत येण्याचे प्रमाण वाढत आहे. हे टाळण्यासाठी **संबंधितांनी वर्गणीदारांचे संपूर्ण नाव, पूर्ण पत्ता व पिन कोड क्रमांक, संपर्क फोन नंबर याबाबतची माहिती संगणकीकृत अगर सुवाच्च अक्षरात लिहून पाठवावयाची दक्षता घ्यावी.**

## ड) शेतकरी मासिकाची विक्री व जाहिराती

### १) शेतकरी मासिकाची विक्री

जिल्हयातील खाजगी पुस्तक विक्रेते एस.टी. स्टँड, रेल्वे स्टेशनवरील बुक स्टॉल, कृषि विज्ञान मंडळे, कृषि विज्ञान केंद्र, कृषी निविष्ठा, कृषि सेवा केंद्रे, सुक्ष्म सिंचन वितरक तसेच कृषि विद्यापिठातील कृषि विस्तार केंद्र यांना शेतकरी मासिक ३० टक्के सवलत देण्यात येते. त्यामुळे त्यांना शेतकरी मासिक विक्रीसाठी प्रवृत करावे. अशा विक्रेत्यांनी एकावेळी किमान ५० अंक सवलतीच्या दराने रोख रक्कम भरून शेतकरी मासिक जमा भरून शेतकरी मासिक कार्यालयातून घेऊन जावे. असा विक्रेता शेतकरी मासिकाची दर्शनी किंमत रूपये १५/- प्रती अंक या दराने किंवा यापेक्षा कमी दराने इतरांना पुर्नविक्री करू शकतो. मात्र या दर्शनी किमतीपेक्षा जास्त दराने त्याला अंक विक्री करता येणार नाही. याशिवाय कृषि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना ३० टक्के सवलतीच्या दराने अंक उपलब्ध करून दिले जातात.

### २) शेतकरी मासिकासाठी जाहिराती स्वीकारणे

**वर्गणीदारांच्या जमा होणा-या रकमेव्यतिरिक्त जाहिरीतीद्वारे जमा होणारा महसूल देखील या मासिकाच्या उत्पन्नाचे एक साधन आहे.** त्यासाठी शुल्क आकारून शेतकरी मासिकातून जाहिरातीही प्रसिद्ध केल्या जातात. आपल्या अधिनस्त जिल्ह्यामधील शेती व शेतीशी निगडित व्यवसायिक उद्योजक, ठिबक/तुषार संच वितरक, निविष्ठा उत्पादक व विक्रेते यांचेकडून जाहिराती मिळवाव्यात. जाहिराती मिळविण्यासाठी **प्रपत्र-२** नुसार लक्ष्यांक निर्धारित करुन देण्यात आले आहेत. जाहिरातीच्या रकमेचा **डी.डी. "संपादक, शेतकरी मासिक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे-५" यांचे नावाने काढण्यात यावा.** प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत जाहिराती प्राप्त झाल्यास पुढील महिन्याच्या अंकातून प्रसिद्धीसाठी जाहिरातीचा समावेश करण्यात येईल. शासनाने शेतकरी मासिकामध्ये प्रसिद्ध करावयाच्या जाहिरातीचे दर निश्चित केले असून त्याची दरसूची पुढीलप्रमाणे आहे.

**जुलै २०११ पासून जाहिरातीचे मंजूर दर**

| अ.क्र. | जाहिरात पान | आकार ( सेंटीमीटर ) | सर्वसाधारण दर रूपये | करार दर रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | मुखपृष्ठ क्र. ४ | १७.५ X १७.५ | २३,००० | २१,००० |
| २ | मुखपृष्ठ क्र.२ व ३ | २२.५ X १७.५ | २०,००० | १८,००० |
| ३ | आतील पृष्ठ अ) पूर्णपान | २२.५ X १७.५ | १७,००० | १५,००० |
| | ब) अर्धे पान | ११.२५ X १७.५ | ८,५०० | ७,५०० |
| | क) १/४ ( पाव पान) | ११.२५ X ८.७५ | ४,२५० | ३,७५० |
| ४ | ओपनिंग पेज १ | २२.५ X १७.५ | २०,००० | १८,००० |
| | ओपनिंग पेज २ | २२.५ X १७.५ | १८,००० | १६,५०० |
| ५ | क्लोजिंग पेज २ | २२.५ X १७.५ | १८,५०० | १६,५०० |
| | क्लोजिंग पेज १ | २२.५ X १७.५ | २०,००० | १८,००० |
| | मिडल कनेक्टेड पेज एक पान | २२.५ X १७.५ | २१,००० | दर करार नाही |
| | मिडल कनेक्टेड डबल दोन पाने | २२.५ X १७.५ | ४०,००० | दर करार नाही |

**टिप-** जाहिरात जर वर्षातील सहा महिन्यांपेक्षा अधिक कालावधीसाठी दिली तरच करार दर लागू राहतील.

**इ) वर्गणीदार करण्यासंबंधीत कार्यक्षम अधिकारी / कर्मचा-यांचा गौरव**

कृषि विभागातील कृषि सहाय्यकापासून ते विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयापर्यंत वर्गणीदार करणे. तसेच शेतकरी मासिकासाठी जाहिराती मिळविणे यासाठी उद्दिष्ट देण्यात आलेली आहेत. विशेष उल्लेखनीय काम करणा-या कर्मचारी/अधिका-यांचा प्रशस्तीपत्रक देऊन गौरव करण्यात येतो. विशेष कामगिरीबाबतचा उल्लेख संबंधित कर्मचारी/अधिका-यांच्या गोपनीय अहवालात करावा. सन २०१३-१४ मध्ये अशाप्रकारे उल्लेखनिय काम केलेल्या अधिकारी/कर्मचा-यांचा प्रस्ताव विभाग स्तरांवरून आयुक्तालयास त्वरीत पाठवावा.

| अ.क्र. | संवर्ग | वर्गणीदार लक्ष (संख्या) | जाहिरात लक्ष (रू.) |
|---|---|---|---|
| १ | कृषि सहाय्यक / कृषि सेवक | प्रति तालुका ७०० प्रमाणे तालुक्यातील कृषि सहाय्यक यांना लक्ष्यांक विभागून द्यावे | लागू नाही |
| २ | कृषि पर्यवेक्षक | प्रति तालुका ७०० प्रमाणे तालुक्यातील कृषि पर्यवेक्षक यांना लक्ष्यांक विभागून द्यावे | लागू नाही |
| ३ | मंडल कृषि अधिकारी / कृषि अधिकारी (पं.स.) | तालुक्यातील मं.कृ.अ./कृ.अ. (पं.स.) यांच्या संख्येनुसार | लागू नाही |
| ४ | तालुका कृषि अधिकारी | ७०० प्रति तालुका | २७७५ प्रति तालुका |
| ५ | कृषि विकास अधिकारी (जि.प.) | ४२० प्रति तालुका | १८५० प्रति तालुका |
| ६ | उप विभागीय कृषि अधिकारी | तालुक्याच्या संख्येनुसार | तालुक्याच्या संख्येनुसार |
| ७ | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | तालुक्याच्या संख्येनुसार | तालुक्याच्या संख्येनुसार |
| ८ | विभागीय कृषि सहसंचालक | तालुक्याच्या संख्येनुसार | तालुक्याच्या संख्येनुसार |

प्रति तालुका किमान ७०० वर्गणीदारांचा लक्ष्यांक निश्चित केला आहे. याचे तालुक्यात कार्यरत असलेल्या कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक व मंडळ कृषि अधिकारी यांचे संख्येनुसार लक्ष्यांक विभागून दयावे. दिलेल्या लक्ष्यांकाच्या २० टक्केपेक्षा जास्त साध्य करणा-या (एकूण लक्ष्यांकाच्या १२० टक्के) कर्मचा-यांना/अधिका-यांना आयुक्तालय स्तरांवरून प्रशस्तीपत्रक देण्यात येईल. यासाठी कर्मचा-यांना दिलेले लक्ष्यांक व त्यांनी केलेले साध्य या बाबतची माहिती आर्थिक वर्ष संपताच १० दिवसात आयुक्तालयास पाठवावी. या व्यतिरिक्त अशासकीय संस्था / इतर शासकीय विभाग / साखर कारखाने / कृषि विज्ञान मंडळ इत्यादीनी किमान ५०० वर्गणीदार केल्यास ते प्रशस्तीपत्रासाठी पात्र राहतील.

या व्यतिरिक्त प्रत्येक संवर्गातून राज्यात प्रथम क्रमांकाचे काम करणा-या अधिकारी / कर्मचा-यास विशेष प्रशस्तीपत्र देण्यात येईल. कृषि सहाय्यक / कृषि पर्यवेक्षक / मंडल कृषि अधिकारी यांना प्रशस्तीपत्र देण्यासाठी त्यांच्या नावाची शिफारस त्यांनी केलेल्या शेतकरी मासिकाच्या वर्गणीदार संख्येसह संबंधित तालुका कृषि अधिकारी यांनी कृषि उपसंचालक तथा संपादक, शेतकरी मासिक यांचेकडे विनाविलंब पाठवावयाची आहेत. सर्व क्षेत्रीय अधिकारी / कर्मचारी यांना **दि. १ जुलै रोजी च्या कृषिदिनाच्या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्रके वितरीत करून गौरविण्यात यावे.**

**मासिक प्रगती अहवाल**

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, प्रकल्प संचालक (आत्मा),कृषि विकास अधिकारी यांनी शेतकरी मासिकाचे झालेले वर्गणीदार व जाहिराती बाबतची माहिती सोबत जोडलेल्या विहीत प्रपत्रात विभागीय कृषि सहसंचालक यांचे मार्फत आयुक्तालयास दरमहा १० तारखेपर्यंत विनाविलंब सादर करावी.

स्वाक्षरीत/-
**कृषि संचालक (विप्र)**
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५

**प्रत-**

१) संचालक, वसंतराव नाईक कृषि व्यवस्थापन, प्रशिक्षण संस्था नागपूर
२) कृषि संचालक (सर्व) ..............................................................
३) संचालक संशोधन, कृषि विद्यापीठ (सर्व) .........................................
४) संचालक विस्तार शिक्षण कृषि विद्यापीठ (सर्व)...................................
५) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व) ...........................................
६) प्रकल्प संचालक (आत्मा) (सर्व) ...........................................
७) प्राचार्य रामेती, प्रादेशिक कृषि व्यवस्थापन संस्था (सर्व)............................
८) कृषि विकास अधिकारी, (जिल्हा परिषद) (सर्व) .......................................
९) प्रमुख समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र (सर्व) .......................................
१०) उपविभागीय कृषि अधिकारी ............................जिल्हा ..................
११) तालुका कृषि अधिकारी .................................जिल्हा ..................
१२) गटविकास अधिकारी, पंचायत समिती ................ जिल्हा .................

## शेतकरी मासिकाचे वर्गणीदार झाले बाबतचे प्रमाणपत्र

श्री. ..................................................... मु.पो. ................ ता. ................ जि. ...........पिन कोड क्र. ............ यांचेकडून शेतकरी मासिकाचे वार्षिक वर्गणी पोटी **रक्कम रु. १५०/-** व **२५०/-** प्राप्त झालेले आहेत. प्राप्त रक्कम चलनाने कोषागारात भरुन आपणास वर्गणीदार करुन घेऊन अंक नियमित पाठविण्याबाबत संपादक, शेतकरी मासिक, कृषि आयुक्तालय, म.रा., कृषिभवन, दुसरा मजला, शिवाजीनगर, पुणे - ५ यांचेकडे कळविण्यात येत आहे.

**स्वाक्षरी**

**कार्यालयाचा पत्ता**

--------------------------------

## मासिक प्रगती अहवाल प्रपत्र
## शेतकरी मासिक सन २०१४-१५

**माहे** .................

| **बाब** | **विभागातंर्गत जिल्हे** | | | | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | |
| **वर्गणीदार** | | | | | |
| अ) लक्षांक | | | | | |
| ब) मागील साध्य | | | | | |
| क) चालू महिन्यातील साध्य | | | | | |
| **जाहिराती** | | | | | |
| अ) लक्षांक | | | | | |
| ब) मागील साध्य | | | | | |
| क) चालू महिन्यातील साध्य | | | | | |
| **अंक विक्री** | | | | | |
| अ) दिलेले अंक | | | | | |
| ब) विक्री केलेले अंक | | | | | |
| क) भरणा केलेली रक्कम रूपये | | | | | |
| **अभिप्राय** | | | | | |

**ठिकाण** :-
**दिनांक** :-

**विभागीय कृषि सहसंचालक**
.............. विभाग ............

# प्रपत्र - १

## २०१४-१५ मध्ये जिल्हानिहाय शेतकरी मासिक वर्गणीदारांचे वार्षिक लक्षांक

| अ.क्र | जिल्हे | तालुके संख्या | जि.अ.कृ.अ. | कृ.वि.अ. | प्रकल्प संचालक (आत्मा) | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ठाणे | १३ | ९१०० | ५४६० | ३६४० | १८२०० |
| २ | रायगड | १६ | ११२०० | ६७२० | ४४८० | २२४०० |
| ३ | रत्नागिरी | १० | ७००० | ४२०० | २८०० | १४००० |
| ४ | सिधुदुर्ग | ९ | ६३०० | ३७८० | २५२० | १२६०० |
| **ठाणे विभाग** | | **४८** | **३३६००** | **२०१६०** | **१३४४०** | **६७२००** |
| ५ | नासिक | १६ | ११२०० | ६७२० | ४४८० | २२४०० |
| ६ | धुळे | ४ | २८०० | १६८० | ११२० | ५६०० |
| ७ | जळगाव | १५ | १०५०० | ६३०० | ४२०० | २१००० |
| ८ | नंदूरबार | ६ | ४२०० | २५२० | १६८० | ८४०० |
| **नासिक विभाग** | | **४१** | **२८७००** | **१७२२०** | **११४८०** | **५७४००** |
| ९ | अहमदनगर | १४ | ९८०० | ५८८० | ३९२० | १९६०० |
| १० | पुणे | १३ | ९१०० | ५४६० | ३६४० | १८२०० |
| ११ | सोलापूर | ११ | ७७०० | ४६२० | ३०८० | १५४०० |
| | **पुणे विभाग** | **३८** | **२६६००** | **१५९६०** | **१०६४०** | ५३२०० |
| १२ | सातारा | ११ | ७८०० | ४६८० | ३१२० | १५६०० |
| १३ | सांगली | १० | ७००० | ४२०० | २८०० | १४००० |
| १४ | कोल्हापूर | १२ | ८४०० | ५०४० | ३३६० | १६८०० |
| **कोल्हापूर विभाग** | | **३३** | **२३२००** | **१३९२०** | **९२८०** | **४६४००** |
| १५ | औरंगाबाद | ९ | ६३०० | ३७८० | २५२० | १२६०० |
| १६ | जालना | ८ | ५६०० | ३३६० | २२४० | ११२०० |
| १७ | बीड | ११ | ७७०० | ४६२० | ३०८० | १५४०० |
| **औरंगाबाद विभाग** | | **२८** | **१९६००** | **११७६०** | **७८४०** | **३९२००** |
| १८ | लातूर | १० | ७००० | ४२०० | २८०० | १४००० |
| १९ | उस्मानाबाद | ८ | ५६०० | ३३६० | २२४० | ११२०० |
| २० | नांदेड | १६ | ११२०० | ६७२० | ४४८० | २२४०० |
| २१ | परभणी | ९ | ६३०० | ३७८० | २५२० | १२६०० |
| २२ | हिंगोली | ५ | ३५०० | २१०० | १४०० | ७००० |
| **लातूर विभाग** | | **४८** | **३३६००** | **२०१६०** | **१३४४०** | **६७२००** |
| २३ | अमरावती | १४ | ९८०० | ५८८० | ३९२० | १९६०० |
| २४ | अकोला | ७ | ४९०० | २९४० | १९६० | ९८०० |
| २५ | वाशिम | ६ | ४२०० | २५२० | १६८० | ८४०० |
| २६ | बुलढाणा | १३ | ९१०० | ५४६० | ३६४० | १८२०० |
| २७ | यवतमाळ | १६ | ११२०० | ६७२० | ४४८० | २२४०० |
| **अमरावती विभाग** | | **५६** | **३९२००** | **२३५२०** | **१५६८०** | **७८४००** |
| २८ | नागपूर | १३ | ९१०० | ५४६० | ३६४० | १८२०० |
| २९ | वर्धा | ८ | ५६०० | ३३६० | २२४० | ११२०० |
| ३० | भंडारा | ७ | ४९०० | २९४० | १९६० | ९८०० |
| ३१ | चंद्रपूर | १७ | ११९०० | ७१४० | ४७६० | २३८०० |
| ३२ | गडचिरोली | १२ | ८४०० | ५०४० | ३३६० | १६८०० |
| ३३ | गोंदीया | ८ | ५६०० | ३३६० | २२४० | ११२०० |
| **नागपूर विभाग** | | **६५** | **४५५००** | **२७३००** | **१८२००** | **९१०००** |
| **एकूण महाराष्ट्र राज्य** | | **३५७** | **२५०,०००** | **१५०,०००** | **१००,०००** | **५००,,०००** |

## प्रपत्र - २ सन २०१४-१५ साठी जिल्हानिहाय जाहिराती करीता आर्थिक लक्षांक

| अ.क्र. | जिल्हा | तालुके संख्या | जाहिरातीकरिता आर्थिक लक्षांक रूपये | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | जि.अ.कृ.अ. | कृ.वि.अ. | एकूण |
| १ | ठाणे | १३ | ३६००० | २४००० | ६०००० |
| २ | रायगड | १६ | ४४४०० | २९६०० | ७४००० |
| ३ | रत्नागिरी | १० | २७७०० | १८५०० | ४६२०० |
| ४ | सिधुदुर्ग | ९ | २५००० | १६६०० | ४१६०० |
| **ठाणे विभाग** | | **४८** | **१३३१००** | **८८७००** | **२२१८००** |
| ५ | नासिक | १६ | ४४४०० | २९६०० | ७४००० |
| ६ | धुळे | ४ | ११,१०० | ७४०० | १८५०० |
| ७ | जळगाव | १५ | ४१६०० | २७८०० | ६९४०० |
| ८ | नंदूरबार | ६ | १६६०० | ११००० | २७६०० |
| **नासिक विभाग** | | **४१** | **११३७००** | **७५८००** | **१८९५००** |
| ९ | अहमदनगर | १४ | ३८८०० | २५९०० | ६४७०० |
| १० | पुणे | १३ | ३६००० | २४००० | ६०००० |
| ११ | सोलापूर | ११ | ३०६०० | २०४०० | ५१००० |
| **पुणे विभाग** | | **३८** | **१०५४००** | **७०३००** | **१७५७००** |
| १२ | सातारा | ११ | ३०६०० | २०४०० | ५१००० |
| १३ | सांगली | १० | २७७०० | १८५०० | ४६२०० |
| १४ | कोल्हापूर | १२ | ३३२०० | २२१०० | ५५३०० |
| **कोल्हापूर विभाग** | | **३३** | **९१५००** | **६१०००** | **१५२५००** |
| १५ | औरंगाबाद | ९ | २५००० | १६६०० | ४१६०० |
| १६ | जालना | ८ | २२२०० | १४८०० | ३७००० |
| १७ | बीड | ११ | ३०५०० | २०४०० | ५०९०० |
| **औरंगाबाद विभाग** | | **२८** | **७७७००** | **५१८००** | **१२९५००** |
| १८ | लातूर | १० | २७६०० | १८५०० | ४६१०० |
| १९ | उस्मानाबाद | ८ | २२२०० | १४८०० | ३७००० |
| २० | नांदेड | १६ | ४४४०० | २९६०० | ७४००० |
| २१ | परभणी | ९ | २५००० | १६६०० | ४१६०० |
| २२ | हिंगोली | ५ | १३८०० | ९३०० | २३१०० |
| **लातूर विभाग** | | **४८** | **१३३०००** | **८८८००** | **२२१८००** |
| २३ | अमरावती | १४ | ३८८०० | २५९०० | ६४७०० |
| २४ | अकोला | ७ | १९५०० | १३००० | ३२५०० |
| २५ | वाशिम | ६ | १६६०० | ११००० | २७६०० |
| २६ | बुलढाणा | १३ | ३६००० | २४००० | ६०००० |
| २७ | यवतमाळ | १६ | ४४४०० | २९६०० | ७४००० |
| **अमरावती विभाग** | | **५६** | **१५५३००** | **१०३५००** | **२५८८००** |
| २८ | वर्धा | ८ | २२२०० | १४८०० | ३७००० |
| २९ | नागपूर | १३ | ३६००० | २४००० | ६०००० |
| ३० | भंडारा | ७ | १९५०० | १३००० | ३२५०० |
| ३१ | चंद्रपूर | १७ | ४७२०० | ३१४०० | ७८६०० |
| ३२ | गडचिरोली | १२ | ३३२०० | २२१०० | ५५३०० |
| ३३ | गोंदीया | ८ | २२२०० | १४८०० | ३७००० |
| **नागपूर विभाग** | | **६५** | **१८०३००** | **१२०१००** | **३००४००** |
| **एकूण महाराष्ट्र राज्य** | | **३५७** | **९,९०,०००** | **६,६०,०००** | **१६,५०,०००** |